**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ३५/२०१६-१७/२१ दिनांक:-०३.०१.२०१७

**आदेश**

**आदेश केस क्र. ३५/२०१६-२०१७**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. श्रीकांत लक्ष्मण अपराध<br>३१९/१९ वखार भाग सांगली<br>जिल्हा. सांगली : | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली. | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>शहर विभाग, सांगली | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मध्य उपविभाग सांगली | |

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२. श्री. नि.बा. बारसिंग, सदस्य सचिव,(प्रभारी)
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहे.

१) तक्रारदार श्री श्रीकांत लक्ष्मण अपराध, सांगली यांनी वितरण कंपनी विरुध्द प्रस्तुत गा-हाणे दाखल केले आहे. त्यांच्या घरामध्ये वीज पुरवठा चालू असून त्यांचा ग्राहक क्र. २७९९४०३०६४९८ असा आहे. सदर ग्राहक क्रमांकावर कोणतीही थकबाकी नाही. तथापि तक्रारदार यांना जून २०१६ चे जे वीज देयक मिळाले त्यामध्ये रु. ४,२७७.९७ पैसे इतकी समायोजित रक्कम दाखवून वाढिव आकारणी करण्यात आली. त्यांनी पाठपुरावा करुन चौकशी केली असता. त्यांना असे सांगण्यात आले की, वरील वाढिव रक्कम त्यांच्या पूर्वीच्या ग्राहक क्र. २७९९४०३०६४८० या वीज जोडणी मधील थकबाकीची आहे. तक्रारदार यांचे असे म्हणणे आहे की, त्यांचे असे कोणतेही अन्य वीज कनेक्शन नव्हते. वरील तथाकथित थकबाकीमुळे त्यांच्या चालू असलेल्या वीज पुरवठयाची देयके स्विकारली जात नाहीत. तसेच त्यांना त्यांचा विज पुरवठा खंडीत करणेबद्दल नोटीस देणेत आली आहे. त्यामुळे दि. ०८-०९-२०१६ रोजी तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार दाखल केली. सदर कक्षाने दि. ०४-११-२०१६ रोजी निर्णय देऊन , वितरण कंपनीच्या संबंधीत अधिका-याने तक्रारदार यांच्या थकबाकीबाबतच्या शंकेचे निरसन करुन महावितरणच्या नियमानुसार कारवाई करावी असा आदेश दिला. सदर आदेशावर नाराज होऊन तक्रारदार यांनी या मंचाकडे प्रस्तुतचे गा-हाणे/अपिल दाखल केले आहे.

२) वितरण कंपनीतर्फे मुद्दे निहाय लेखी निवेदन सादर करण्यात आले आहे. त्यांचे असे निवेदन आहे की, महावितरणच्या मा. कार्यकारी संचालक मुंबई यानी सांगली येथे बैठक घेऊन ज्या वीज ग्राहकांची वीज जोडणी कायम स्वरुपी बंद आहे, अशा वीज जोडणी वरील येणे थकबाकी त्यांच्या सध्या चालू असलेल्या वीज पुरवठयाच्या देयकामध्ये वर्ग करण्यात यावी. तक्रारदार यांची ग्राहक क्र. २७९९४०३०६४८० ही वीज जोडणी दि. ०४-०४-१९९५ पासून कायम स्वरुपी बंद आहे. त्यांची थकबाकी रु. ४,३१२.१९ पैसे इतकी होती. सदर थकबाकी तक्रारदार यांनी भरणा न केल्यामुळे ती त्यांच्या चालू असलेल्या वीज पुरवठयावरील जून २०१६ च्या देयकामध्ये वर्ग करण्यात आली. वि.प. यांनी शेवटी तक्रारदारांचे गा-हाणे नामंजूर करणेत यावे अशी या मंचास विनंती केली आहे.

३) सदर प्रकरणाची सुनावणी दि. २३-१२-२०१६ रोजी या मंचासमोर नेमणेत आली होती. मंचाचे सदस्य सचिव श्री प्रदिप वि. खपली हे रजेवर असल्यान प्रभारी सदस्य सचिव श्री बारसिंग यांनी काम पाहिले.

तक्रारदार स्वतः व त्यांचा मुलगा अभिमन्यू यांनी तोंडी गा-हाणे मांडले वि.प. तर्फे कार्यकारी अभियंता श्री अनिल थोरात यांनी युक्तिवाद केला. उपलब्ध कागदपत्रांचे वाचन करणत आले आहे.

४) तक्रारदार यांचे गा-हाणे, उपलब्ध कागदपत्रे , वि.प. यांचे म्हणणे आणि तोंडी युक्तिवादाचा विचार करता या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष यापुढे नमूद केलेल्या कारणास्तंव पुढील प्रमाणे नोंदवणेत येतात.

(१) पूर्वीचा म्हणजे सन-१९९५ मध्ये कायम स्वरुपी खंडीत झालेला वीज ग्राहक क्र. २७९९४०३०६४८० या मधील येणे असलेली तथाकथित थकबाकी प्रस्तुत तक्रारदार यांचेकडून वसूल करणेचा वितरण कंपनीस अधिकार राहिला आहे काय?

(२) उत्तरः- नाही.

(३) कोणता अंतिम आदेश?

उत्तर :- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## कारणमिमांसा

५) तक्रारदार यांचे असे निवेदन आहे की, त्यांची ग्राहक क्र. २७९९४०३०६४८० या क्रमांकाची कधीही वीज जोडणी अस्तित्वात नव्हती. तक्रारदार यांचे सध्याचे घरगुती वीज कनेक्शन ग्राहक क्र. २७९९४०३०६४८० चे चालू आहे व त्यावर कोणतीही थकबाकी येणे नाही, याबद्दल वाद नाही. वि.प. तर्फे असे निवेदन करण्यात आले की, वरील दोन्ही वीज जोडण्या तक्रारदार यांना १९६५ मध्ये देणेत आल्या होत्या आणि त्यापैकी वादग्रस्त वीज जोडणी एप्रिल १९९५ मध्ये कायमपणे खंडीत करण्यात आली. असेही पुढे निवेदन केले की, वादग्रस्त वीज जोडणी वरील शेवटची वीज देयक भरल्याची पावती दि. ३१-०८-१९९० ची तक्रारदार यांचे नावची होती. तथापि वरील निवेदनाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल नाही.

६) ते काहीही असो, आपण क्षणभर असे गृहीत धरुन चालू की, वादग्रस्त वीज जोडणी तक्रारदार यांचे नांवे एप्रिल १९९५ पर्यन्त चालू होती आणि जेव्हा ती दि. ०४-०४-१९९५ रोजी कायम स्वरुपी खंडीत केली तेव्हा त्यावर रु. ४,३१२.१९ पैसे अगर रु.४,२७७.९४ पैसे इतकी थकबाकी तक्रारदारकडून विद्युत मंडळास येणे होती. तथापि, तत्कालीन वीज मंडळाने सन-१९९५ पासून विहीत मुदतीत वसूली कारवाई का केली नाही, हे समजून येत नाही. विद्युत कायदा २००३ च्या कलम ५६(१) प्रमाणे थकबाकी वसूल करण्यासाठी कोणतीही कारवाई करणेत आली नाही, असे दिसून येते त्याकरिता, त्यावेळचे संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांना जबाबदार धरावे लागेल.

७) एखाद्या ग्राहकाची वीज थकबाकी, ग्राहकाकडून वसूल करता येईल असे जरी मानले तरी विद्युत कायदा २००३ च्या कलम ५६ (२) प्रमाणे काही नियमाची पूर्तता झाली असणे गरजेचे आहे. वीज ग्राहकाकडून येणे असणारी थकबाकी मुदतीमध्ये असणे जरुरीचे आहे. ती थकबाकी अव्याहतपणे (Continuously ) वसूलीस पात्र असल्याचे दर्शविण्यात आले असले पाहिजे. कलम ५६(२) प्रमाणे मागिल दोन वर्षापेक्षा अधिक कालावधीची अशी थकबाकी मुदतबाहय ठरते. कलम ५६(१) नुसार वितरण कंपनीस अशा थकबाकीदार ग्राहकास पंधरा दिवसांची रितसर नोटीस देऊन सक्षम न्यायालयात दावा दाखल करता येतोच, शिवाय वीज पुरवठा खंडीत सुध्दा करणेचा अधिकार आहे.

८) प्रस्तुत प्रकरणांत, वितरण कंपनीने उपरोक्त श्री श्रीकांत लक्ष्मण अपराध,यांचे विरुध्द , वीज जोडणी कायम स्वरुपी बंद करण्या व्यतिरिक्त , कलम ५६ प्रमाणे अन्य काही कारवाई केली असल्याचे आढळून येत नाही.

९) महावितरणचे मा. कार्यकारी संचालकसाहेब यांनी सांगली येथे बैठक घेऊन दि. ०६-०७-२०१३ च्या परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करण्यास सांगितले असे निवेदन वि.प.तर्फे करण्यात आले आहे, परंतु विद्युत कायदा २००३ मधील आणि विशेषत: कलम ५६ मधील तरतूदी दुर्लक्षित करता येणार नाहीत. कलम ५६(१) प्रमाणे कायदेशीर कारवाई वि.प. यांनी केली नाही. सन १९९५ पासून कथित थकबाकी अव्याहतपणे/सातत्याने वीज देयकांमध्ये दर्शविण्यात आली नाही असे दिसून येते, तक्रारदार यांनी वादग्रस्त वीज जोडणी वरील वीज देयक जर शेवटी दि. ३१-०८-१९९० रोजी भरले असेल तर त्यानंतर थकबाकी वसूलीसाठी २५ वर्षे कोणतीच कायदेशीर कारवाई केली नाही. त्यामुळे तथाकथित थकबाकी तक्रारदार यांच्या चालू वीज जोडणीच्या देयकांमध्ये वर्ग करण्याची कारवाई कायदेशीर ठरत नाही. प्रचलीत कायद्यानुसार , थकबाकी तक्रारदारकडून वि.प. यांना वसूल करता येणार नाही, असे या मंचाचे सप्ष्ट मत आहे.

१०) तक्रारदार यांनी झालेल्या मनस्तापाबद्दल नुकसान भरपाईची मागणी केली आहे. तथापि अशी भरपाई मंजूर करणे योग्य होणार नाही. त्याबाबत कागदोपत्री पुरावा नाही. शिवाय, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील परिच्छेद ८.२ या तरतूदीचा बाध येतो.

११) वरील सर्व कारणांस्तव उपरोक्त तक्रारदार यांचे गा-हाणे अंशत: मंजूर होणेस पात्र आहे. वितरण कंपनीचे म्हणणे की. तक्रारदार यांना दिलेली जून २०१६ पासूनची वीज देयके योग्य व बरोबर आहेत. हे स्विकारार्ह नाही.

सबब खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येतो.

## आदेश

१) तक्रारदार श्री श्रीकांत लक्ष्मण अपराध, ३१९/१९ वखार भाग सांगली यांचे गा-हाणे खालील प्रमाणे अशंत: मंजूर करण्यात येत आहे.

२) वीज ग्राहक क्र. २७९९४०३०६४८० यावर येणे असलेली कथित थकबाकी, वीज ग्राहक क्र. २७९९४०३०६४९८ यामधील देयकामंध्ये वर्ग करण्याची कारवाई अयोग्य असल्याचे ठरविणेत येत आहे. सदर कथित थकबाकी, त्यावरील विलंब आकार , व्याज वगैरे वजा करुन तक्रारदार यांना सुधारीत वीज देयके त्यांच्या प्रत्यक्ष वीज वापरा प्रमाणे देणेत यावीत असा वि.प. यांना आदेश करणेत येतो.

३) दि. २०-०८-२०१६ रोजी तथाकथित थकबाकी पोटी वीज ग्राहक क्र. २७९९४०३०६४९८ चा वीज पुरवठा खंडीत करणेबद्दल वि.प. यानी दिलेली नोटीस रद्द करण्यात येत आहे.

४) तक्रारदार यांची नुकसान भरपाई मिळणेची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

५) वीज ग्राहक क्र. २७९९४०३०६४८० यावरील कथित थकबाकी वसूल करण्यासाठी ज्या अधिकारी/कर्मचारी यांना कर्तव्यात कसूर केली त्यांचे विरुध्द नियमानुसार कारवाई करणेत यावी, आणि जरुर त्यांचेकडून तर सदर थकाबकी व्याजासह वसूल करावी असाही वि.प. यांना आदेश देणेत येतो.

६) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

७) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (नि.बा. बारसिंग) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |